**Prabhat, Pune, August 25, 2010**

# टीसीएसीची ३१ ऑगस्टला तंत्रज्ञान प्रश्नमंजुषा

TATA

TATA CONSULTANCY SERVICES

पुणे, दि. २४ - टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस टीसीएस आयटी विझच्या २०१० सालची पुणे फेरी ३१ ऑगस्ट रोजी आयोजित केली जाणार असल्याची घोषणा केली आहे. शाळेकरिता आयोजित केली जाणारी भारतातील सर्वात मोठी तंत्रज्ञान प्रश्नमंजुषा म्हणून नावाजली जाणारी टीसीएस आयटी विझ पुणे कॅम्प येथे नेहरू मेमोरियल हॉलमध्ये पार पडेल.

इयत्ता आठवी ते १२वीचे विद्यार्थी टीसीएस आयटी विझमध्ये सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेसाठी कोणत्याही प्रकारचे प्रवेश शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. टीसीएस आयटी विझमध्ये सहभागी होण्यास इच्छुक असलेली कोणतीही शालेय संस्था एकापेक्षा अधिक संघ पाठवू शकते. एका संघात दोनच स्पर्धक असणे आवश्यक आहे. इच्छुक शालेय संस्थांनी आपापल्या प्रवेशिका २६ ऑगस्ट या दिवशी किंवा त्यापूर्वी सुचिता मंत्री, टीसीएस आयटी विझ को-ऑर्डिनेटर यांचेकडे टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस, हडपसर इंडस्ट्रियल इस्टेट, पुणे-१३ या पत्त्यावर पाठवाव्यात. यावर्षी ऑनलाईन रजिस्ट्रेशनची सुविधादेखील शाळांकरिता उपलब्ध करून देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी www.tcsitwiz.com या वेबसाईटवर किंवा ०२० - ६६०८६२२७ / ९१ ९२२५५०८३०४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. टीसीएस आयटी विझबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना टीसीएस पुणे ऑपरेशन्सचे अरविंद पाध्ये यांनी सांगितले की, महत्वाकांक्षी व जिज्ञासू युवा पिढीसाठी माहिती तंत्रज्ञान विषयातील सर्वोत्कृष्ट मंच म्हणजे टीसीए आयटी विझ होय.